## वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

# सूचना

याद्वारे जिल्हा न्यायालय आस्थापनेवरुन सेवानिवृत्त झालेले लघुलेखक ग्रेड-२, अधिक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक आणि शिपाई यांना कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. बी (डब्ल्यू) ऐ-२१०८/२०१९/१९८२/१४८४७, दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२० नुसार वाशिम येथे एक जलदगती विशेष न्यायालय ( For disposal of cases under Rape & POCSO Act) सुरू करण्यात येणार आहे. त्याकरीता सेवानिवृत्त कर्मचा-यांमधून कंत्राटी पध्दतीने एक वर्षाकरीता खालील प्रमाणे पदे भरणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | लघुलेखक ग्रेड-२ | १ |
| २ | अधिक्षक | १ |
| ३ | वरिष्ठ लिपिक | १ |
| ४ | कनिष्ठ लिपिक | २ |
| ५ | शिपाई | २ |

त्यास्तव, सदर न्यायालयात काम करण्यास इच्छूक असलेल्या उपरोक्त पदावरून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनी आपले विकल्प दिनांक ०३/११/२०२० पर्यंत जिल्हा न्यायालय, वाशिम येथे पोहोंचतील अशा बेताने सादर करावे. दिनांक ०३/११/२०२० नंतर आलेल्या विकल्पाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. करीता नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

**प्र. प्रबंधक,**
जिल्हा न्यायालय, वाशिम